संक्षिप्त खटला नं. 20370 /२०26
सरकार विरुध्द
नि. क्र.

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २८६ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख.**

श्री. एस. बी. पाटील, न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मोटार वाहन न्यायालय, पुणे यांचे न्यायालयात.

१. अपराध घडल्याचा दिनांक :- 21/01/२०26

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक :- 21/01/२०26

३. तक्रारदाराचे नांव व हुद्दा, :– महाराष्ट्र सरकार तर्फे
प्रभारी अधिकारी, वाहतुक विभाग ...हिंजवडी...

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता :– भूषण बळदेव निशाणी
रा. ... संतोष नगर वाकड,
... पुणे ...

५(अ ) अपराधाचा तपशिल. :–

आपण दिनांक 21/01/२०26 रोजी 10.23 वाजण्याच्या सुमारास डांगेचौक ... ..., पुणे येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच.–...15 HV 8572. हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर चुकीच्या दिशेने (वन वे मध्ये) चालवुन तुम्ही मोटार वाहन चालविण्याचे नियम २०१७ मधील नियम ४(६) चे उल्लंघन करुन मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११८ सह कलम १७७–अ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

**६. आरोपीचे प्रतिकथन :–**

प्र.क्र.१ :– तुम्हाला पोलिस पेपर्सची नक्कल मिळाली काय ?
उत्तर :– होय.
प्र.क्र.२ :– तुम्हाला तुमचेवर ठेवणेत आलेला दोषारोप वाचून दाखविला तो तुम्हांला समजला काय ?
उत्तर :– होय.
प्र.क्र.३ :– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :– होय, मला गुन्हा कबुल आहे.

[signature] ...

आरोपीची सही

[signature] 1.8.2026

न्यायदंडाधिकारी वर्ग –१.
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

## न्यायनिर्णय

आरोपी स्वतः / तर्फे — न्यायालयासमोर हजर झाला. आरोपी विरुध्द लावण्यात आलेल्या आरोपांचा तपशिल नोंदवुन त्याचे प्रतिकथन नोंदविले असता त्याने स्वखुषीने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबुल करतांना त्याचेविरुध्द कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन नसल्याचे त्याने सांगितले. आरोपीस गुन्हा कबुल केल्यास शिक्षा होऊ शकते याची जाणीव करुन दिली. तरीही त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. यावरुन आरोपीची कबुली स्वखुषीने आहे असे दिसुन येते.

२. आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रस्तुतचा त्याचा गुन्हा पहिलाच असुन अनावधानाने सदरचा गुन्हा घडल्याचे व त्याची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे असे सांगितले. त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी त्याने विनंती केली. आरोपीच्याविरुध्द लावण्यात आलेल्या आरोपास केवळ द्रव्यदंडाची शिक्षा आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## :– आदेश –:

१. आरोपी ...[illegible]... याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २८६ प्रमाणे मोटार वाहन चालविण्याचे नियम, २०१७ मधील नियम ४(६) चे उल्लंघन करुन मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११८ सह कलम १७७अ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रु. १,०००/– (अक्षरी रु. एक हजार मात्र) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे, द्रव्यदंड न भरल्यास ०२ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

1.8.2026

दिनांक–01 /08 /२०२६

(एस. बी. पाटील),
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

Fine of Rs. 1000/-
Paid on 01/8/2026
Vide R. No. 031/830
01/8/2026
Sr. Clerk
J.M.F.C.(M.V.)
Pune.